01C


।। जय महाराष्ट्र ।।

# सौ. निशा नरेश नार्वेकर शिव सेना

जिल्हा संघटक


दिनांक : १३ ऑक्टोबर २०२६

प्रति,

**मा. महापौर,**

मिरा-भाईंदर महानगरपालिका,

**विषय : सत्ताधाऱ्यांच्या राजकीय आकसापोटी कुलूपबंद ठेवण्यात आलेले 'हिंदुहृदयसम्राट आदरणीय बाळासाहेब ठाकरे कलादालन' १ नोव्हेंबर २०२६ पूर्वी खुले करण्याबाबत...**

महोदय / महोदया,

मिरा-भाईंदर शहराच्या सांस्कृतिक व शैक्षणिक वैभवात भर घालणाऱ्या 'हिंदुहृदयसम्राट आदरणीय बाळासाहेब ठाकरे कलादालना'बाबत महानगरपालिका प्रशासन आणि सत्ताधारी भारतीय जनता पक्षाकडून सुरू असलेला बेजबाबदारपणा व आकसपुर्ण कारभार आता अत्यंत असह्य व चीड आणणारा ठरत आहे. महाराष्ट्र राज्य परिवहन मंत्री तथा धाराशिव जिल्हा पालकमंत्री तसेच मिरा-भाईंदर शहराचे लोकप्रतिनिधी मा. ना. श्री. प्रताप सरनाईक यांच्या सततच्या पाठपुराव्यातून आणि राज्य शासनाच्या निधीतून करोडो रुपये खर्च करून हे भव्य व अद्‌वितीय कलादालन उभारण्यात आले असून, विशेष म्हणजे यासाठी मिरा-भाईंदर महानगरपालिकेचा एकही रुपया खर्च झालेला नाही. लहान मुले, विद्‌यार्थी, कलाप्रेमी, स्पर्धा परीक्षांचे परीक्षार्थी, महिला वर्ग, विज्ञानप्रेमी आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी हे कलादालन एक उत्तम सांस्कृतिक केंद्र व प्रेरणास्थान ठरणार होते. परंतु, अत्यंत खेदाची बाब म्हणजे महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण होऊन आणि जवळपास एक वर्षाहून अधिक काळ लोटूनही हे कलादालन अद्‌याप जनतेसाठी खुले करण्यात आलेले नाही.

हे कलादालन बंद असतानाही याच्या देखभालीसाठी आणि सुरक्षेसाठी दरमहा सुमारे पंधरा लाख रुपये जनतेच्या करातून उधळले जात आहेत. वास्तू धूळ खात पडली आहे आणि तिची दुरवस्था होत असून या आर्थिक उधळपट्टीला जबाबदार कोण, हा मोठा प्रश्न आहे. केवळ या वास्तूला 'हिंदुहृदयसम्राट आदरणीय बाळासाहेब ठाकरे' यांचे नाव आहे, या एकाच संकुचित व आकसयुक्त कारणाने शहरातील सत्ताधारी भारतीय जनता पक्षाच्या दबावाखाली प्रशासन हे कलादालन सुरू करण्याचे टाळत आहे, हा

मिरा भाईंदर महानगरपालिका
महापौर दालन
पोच
for 13/10/2026
लिपीक / स्वीय सहाय्यक

पोच
13/10/2026
आवक लिपीक
मिरा - भाईंदर महानगरपालिका

।। जय महाराष्ट्र ।।
सौ. निशा नरेश नार्वेकर शिव सेना
जिल्हा संघटक

आमचा थेट आणि उघड आरोप आहे. शहरात एकीकडे शिवसेना हिंदू सण, उत्सव आणि संस्कृती जपण्याचे काम करत असताना प्रशासनाकडून विविध कारणांनी परवानग्या नाकारल्या जातात, तर दुसरीकडे राज्य शासनाकडून आलेल्या विकासकामांच्या निधीतून होणारी कामे रोखली जातात. हा प्रकार लोकशाहीचा आणि मिरा-भाईंदरच्या नागरिकांचा उघड अवमान आहे. भूतकाळात या कलादालनाचा प्रस्ताव जेव्हा महासभेत आला होता, तेव्हा ज्या नेत्यांनी जे आता या शहराचे आमदार आहेत त्यांना महापालिकेत शिवसैनिकांनी कशा प्रकारे दणका दिला होता, याचा विसर प्रशासनाला आणि सत्ताधाऱ्यांना बहुदा पडलेला दिसतो. गेल्या दिवाळीत हे कलादालन खुले करण्याचे आश्वासन प्रशासनाने दिले होते, मात्र आज दुसरी दिवाळी तोंडावर आली तरी ही वास्तू कुलूपबंदच आहे. शहरातल्या सामान्य नागरिकांना, विद्यार्थ्यांना आणि कलाकारांना त्यांच्या हक्काच्या कलादालनापासून वंचित ठेवण्याचा हा प्रशासकीय व राजकीय कट शिवसेना अजिबात सहन करणार नाही.

येत्या १ नोव्हेंबर २०२६ (दिवाळीपूर्वी) 'हिंदुहृदयसम्राट आदरणीय बाळासाहेब ठाकरे कलादालन' सर्वसामान्य जनतेसाठी पूर्ण क्षमतेने खुले करण्यात यावे. जर १ नोव्हेंबरपर्यंत हे कलादालन सुरू झाले नाही, तर शिवसेना मिरा-भाईंदरच्या वतीने महानगरपालिकेच्या विरोधात तीव्र, आक्रमक व 'शिवसेना' शैलीत आंदोलन छेडण्यात येईल. या आंदोलनामुळे शहरात निर्माण होणाऱ्या सर्व कायदा व सुव्यवस्थेच्या परिस्थितीस संपूर्णपणे मिरा-भाईंदर महानगरपालिका प्रशासन आणि सत्ताधारी जबाबदार राहतील, याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

प्रत,

**मा. आयुक्त,**

मिरा-भाईंदर महानगरपालिका,

आपला नम्र,

Narvekar

**( निशा नरेश नार्वेकर )**

**कार्यालय :- शाखा क्र. १२, रामदेव पार्क चौक, मिरारोड (पू), जि.ठाणे - ४०११०७. मोबा. ८७७९७१३१०३**